COMMISSIONER OF POLICE
NASHIK CITY.
पोलीस आयुक्त कार्यालय, नाशिक शहर.
गंगापुर रोड, नाशिक –४२२००२
Email Id:- cp.nashik@mahapolice.gov.in

गोपनीय क्र.कक्ष.१०/विशा/मनाई आदेश/मपोअ क.४०(१) /३०६८/ २०२२ दि.१७/०४/२०२२

# आदेश

## महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४०(१) अन्वये

विषयः– नाशिक पोलीस आयुक्तालय येथे मशिंदीवरील भोंगे बाबत...

...

१) ज्याअर्थी, श्री.राज ठाकरे, अध्यक्ष राजकीय पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांनी त्यांचे दि.०२/०४/२०२२ व दि.१२/०४/२०२२ चे भाषणामध्ये असे जाहिर केलेले आहे की, ज्या मशिंदीवरून अजानचे भोंगे वाजतील त्याच ठिकाणी हनुमान चालीसाचे पठण भोंगे लावुन करण्यात येईल;

२) ज्याअर्थी, श्री. राज ठाकरे, अध्यक्ष महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांचे कडुन माननीय सर्वोच्च न्यायालयाचे १८ जुलै २००५ चे ध्वनी क्षेपक संबधी निर्णयाचे अनुषंगाने मशिदींवरील भोंग्यामधुन उच्च स्वरात घोषणांमुळे सार्वजनिक शांतता भंग होत असल्यामुळे ३ मे २०२२ पर्यत मशिंदीवरील भोंगे उतरविण्याकरीता इशारा (अल्टीमेटम) देण्यात आलेला आहे;

३) ज्याअर्थी, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, नाशिक राजगड जिल्हा मध्यवर्ती कार्यालय नाशिकचे जिल्हाध्यक्ष/शहराध्यक्ष /प्रदेश उपाध्यक्ष व इतर पदाधिकारी कडुन जा.क्र. ६९३/२०२२ दि.०९/०४/२०२२ रोजी चे पत्रान्वये पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांना मशिंदीवरील भोंगे उतरविण्याच्या मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे तात्काळ पालन होणबाबत समक्ष पत्र देण्यात आलेले आहे;

17.4.22

पोलीस आयुक्त नाशिक शहर



Scanned with CamScanner

४)  ज्याअर्थी, उपरोक्त नमुद पत्रामध्ये असे नमुद आहे की, ''महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे मा.महोदयांना विनंती की, जसे बॅनर,हेलमेट सक्ती सारख्या विषयावर आपण जनहितार्थ सक्तीने निर्णय घेतले आहेत, तसेच मशिंदीवरील भोंगे उतरविण्याच्या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे सक्तीने पालन व्हावे. मशिंदीवरील भोंगे तात्काळ (०८ दिवसाच्या आत) न उतरविल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेना अध्यक्ष सन्मानीय श्री.राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मशिदी समोर दुप्पट आवाजात भोंगे लावुन हनुमान चालीसाचे पठण करण्यात येईल व याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या प्रशासनाची राहील याची नोंद घ्यावी;''

५)  ज्याअर्थी, उपरोक्त परिच्छेद क्र. १,२,३ व ४ यास अनुसरून काही ठिकाणी याची अंमलबजावणीही सुरू झाली असुन, नाशिक शहर आयुक्तालय येथे दि.०५/०४/२०२२ रोजीचे दै.पुढारी वर्तमान पत्रात असे नमुद आहे की, ''मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी जाहिर सभेत केलेल्या आवाहना नुसार मनसे तर्फे नाशिक येथील भद्रकाली परिसरातील, भद्रकाली मंदिर येथे सोमवार (दि. ०४ एप्रिल) पहाटे भोंग्याव्दारे हनुमान चालीसा सादर करण्यात आली व त्याचे छायाचित्र पण प्रसिध्द करण्यात आलेले आहे;''

६)  ज्याअर्थी, सुन्नी मर्कजी सिरत कमेटी नाशिक कडुन मुस्लिम समाजाचे प्रतिनिधी स्वरूपात दि.१६/०४/२०२२ रोजी पत्र प्राप्त झाले असुन त्यामध्ये असे नमुद आहे की, नाशिक शहरातील मुस्लिम बांधवांकडुन, पहाटे ५ वाजता, दु. ०१:१५ वा, सायंकाळी ०५:१५ वा, ०६:३० वा. आणि रात्री ०८:३० वा. मशिदीवरून नमाजाकरीता भोंग्यावरून अजान दिली जाते व हि मुस्लिम धार्मिक परंपरा नाशिक शहरात, हाफीज हिसामुद्दीन खतीब–शहर–ए–खतीब यांचे नेतृत्वात कायम आहे. व ती परंपरा अबाधित राहावी अशी विनंती करण्यात आली आहे;

७)  ज्याअर्थी, मा. भारतीय सर्वोच्च न्यायालय, यांनी १८ जुलै २००५ चे ध्वनी क्षेपकाच्या निर्णयामध्ये खालील गोष्टी नमुद केलेल्या आहेत;

17.4.22

पोलीस आयुक्त नाशिक शहर



Scanned with CamScanner

i) The Noise level at the boundary of the public place, where loud speaker or public address system or any other noise source is being used shall not exceed 10 dB (A) above the ambient noise standards for the area or 75 dB (A) whichever is lower.

ii) No one shall beat a drum or tom-tom or blow a trumpet or beat or sound any instrument or use any sound amplifier at night (between 10 pm to 6 pm) except in public emergencies.

iii) The peripheral noise level of privately owned sound system shall not exceed by more than 5 dB (A) than the ambient air quality standard specified for the area in which it is used, at the boundary of the private place.

८) ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग मंत्रालयाचे शासन निर्णय क्र. ध्वनी प्र. २००९/प्र.क्र.९५/ता.क. १ दि.२१ एप्रिल २००९ चे अनुषंगाने Ambient Air Quality Standards in respect of noise दिवसपाळी/ रात्रीपाळी मध्ये म्हणजे (दिवसपाळी सकाळी ०६:०० ते रात्री १०:०० पर्यत व रात्रपाळी म्हणजे रात्री १०:०० ते सकाळी ०६:०० पर्यत ) खालील नमुद Standards प्रमाणे असावे असे नमुद केलेले आहे;

| क्षेत्र /झोन वर्गवारी | रात्रीपाळी | दिवसपाळी |
|---|---|---|
| i) औदयोगिक क्षेत्र | 70 dB (A) | 75 dB (A) |
| ii) व्यावसायिक क्षेत्र/वाणिज्य क्षेत्र | 55dB (A) | 65 dB (A) |
| iii) निवासी क्षेत्र | 45 dB (A) | 55 dB (A) |
| iv) शांतता परिक्षेत्र | 40 dB (A) | 50 dB (A) |

पोलीस आयुक्त नाशिक शहर

17.4.22



Scanned with CamScanner

९)        ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांनी शासन परिपत्रक क्र.DIS 910/ प्र.क्र ४३४ (भाग–२)/ विशा १ ब दि. २८/०२/२०१७ जनहित याचिका क्र. १७३/२०१० डॉ बेडेकर विरूध्द महाराष्ट्र शासन व इतर (ध्वनी नियंत्रणासाठी संनियत्रण समिती स्थापन करण्याबाबत) अन्वये पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांना नाशिक शहर पोलीस आयुक्तालया करीता ''ध्वनी प्रदुषण सनियंत्रण समितीचा'' अध्यक्ष म्हणुन घोषित/नियुक्त केलेले असुन ध्वनी प्रदुषण संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालय/ उच्च न्यायालय, मुंबई; , महाराष्ट्र शासन व पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य यांच्याकडुन दिलेले निर्देश व सुचनांची पुर्तता होत आहे किंवा नाही याची खात्री व अंमलबजावणीची सर्वस्वी जबाबदारी ''ध्वनी प्रदुषण सनियंत्रण समितीची'' असेल असे नमुद केलेले आहे;

१०)        ज्याअर्थी, नाशिक शहर पोलीस आयुक्तालयाचे विशेष शाखेने त्यांचे जा.क्र. ३०६५ /२०२२ दि.१७/०४/२०२२ गोपनीय अहवालात असे नमुद केले आहे की, महाराष्ट्र नवनिर्माण सेने कडुन प्रसारित झालेल्या मशिंदीवरून भोंगे काढुन घेण्याचे धोरणानुसार मुस्लिम समाजामध्ये पसरलेली भितीचे वातावरणामुळे वाद विवाद तंटा निर्माण होवुन गंभीर स्वरूपाचे कायदा व सुव्यवस्था चे प्रश्न निर्माण होवुन सार्वजनिक शांतता भंग होण्याची शक्यता नाकारता येत नाही;

११)        त्याअर्थी, मी दीपक शिवानंद पाण्डेय्, पोलीस आयुक्त, नाशिक शहर महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४०(१) व ३३ (द)(तीन) व कलम ३६ (ङ क) अन्वये दिलेल्या अधिकाराचा वापर करून नाशिक शहर पोलीस आयुक्तालयाचे हद्दीसाठी खालील प्रमाणे आदेश देत आहे;

**i**) महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला मशिदी समोर हनुमान चालीसाचे पठणचा कोणत्याही प्रस्थापित प्रथांचा अधिकार नसुन तो फक्त सामाजिक तेढ व धार्मिक तंटा निर्माण करण्याचे हेतुने करण्यात आलेला असुन नाशिक शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत मशिंदीचे १०० मीटरचे परिसराचे आत ध्वनी क्षेपकव्दारे अजानचे वेळी ( पहाटे ५ वाजता, दु. ०१:१५ वा, सायंकाळी ०५:१५ वाजता ,



पोलीस आयुक्त नाशिक शहर

Deepak 17.4.22

०६:३० वा. आणि रात्री ०८:३० वा.) चे १५ मिनीटपुर्व व १५ मिनीट नंतर हनुमान चालीसा किंवा इतर कुठल्याही प्रकारचे भजन, गाणे किंवा इतर भोंगे व इतर वादयव्दारा प्रसारित करण्याकरीता मनाई करण्यात येत आहे.

**ii**) नाशिक शहर पोलीस आयुक्तालयात प्रत्येक मशिद/मंदिर/ गुरूव्दारा/चर्च व इतर धार्मिक स्थळ आस्थापनांना भोंगे/ ध्वनी प्रक्षेपण यंत्र लावण्यासाठी पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांच्याकडे अर्ज करावे व लेखी मंजुरी आदेश प्राप्त झाल्यानंतरच भोंगे/ध्वनी प्रक्षेपण यंत्राचा वापर करावा. सदर हा आदेश ३ मे २०२२ पासुन अंमलात येईल.

**iii**) प्रस्थापित प्रथा व मा. सर्वोच्च न्यायालयाचे मार्गदर्शक तत्व लक्षात घेता नाशिक शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत सर्व अजानसाठी भोंग्यातुन आवाज देण्याची परवानगी (ध्वनी पातळी २१ एप्रिल २००९ चे शासन निर्णय व १८ जुलै २००५ मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार असावी) देण्यात येत आहे.

**iv**) ज्या पक्षकार यांना असे वाटत असले की, मशिदीची सकाळचे ५ वाजेची अजान प्रस्थापित प्रथा व मा.सर्वोच्च न्यायालयाचे दिलेले मार्गदर्शक तत्व चे परस्पर विरोधात आहे, असे पक्षकार ( महाराष्ट्र नवनिर्माण सेना किंवा सुन्नी मर्कज सिरत कमिटी नाशिक किंवा इतर नागरीक ) यांनी या संदर्भात सक्षम न्यायालयाकडुन आदेश प्राप्त करून घ्यावे आणि पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांचे लक्षात आणुन दयावे. पोलीस आयुक्त, नाशिक शहर महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे ४०(२) अन्वये सुधारित आदेश पारित करतील.

**v**) सदर आदेश हा तात्काळ प्रभावाने लागु करण्यात येत आहे; मात्र मंदिर/मशिद/गुरूव्दारा/चर्च व इतर धार्मिक स्थळ यांना ३ मे २०२२ पर्यंत भोंगेसाठी परवानगी घेण्याची मुभा असेल; तदनंतर सर्व गैरकायदेशिर भोंगे जप्त करण्यात येईल व कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.

Deepak 17.4.22

पोलीस आयुक्त नाशिक शहर



Scanned with CamScanner

**vi**) सदर आदेशाचे पालन न केल्यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४०(१) अन्वये उल्लंघन केलेले आहे असे गृहित धरून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १३५ (१) अन्वये कार्यवाही करण्यात येईल ज्यामध्ये कमीत कमी ४ महिने तुरूंगवास जो १ वर्षापर्यत वाढवता येवु शकेल व द्रव्य दंड अशा शिक्षेची तरतुद आहे.

**vii**) जर पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांना योग्य वाटल्यास तर या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती विरूध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १३५ (१) व्यतिरिक्त महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५६ (१) अन्वये तडीपारीची कारवाई करण्यात येईल आणि विशेष परिस्थितीत मध्ये **Maharashtra Prevention of Communal , Anti Social and other Dangerous Activities Act 1980** अंतर्गत **Preventive Detention** ची कार्यवाही केली जावु शकते व तीचा कालावधी ६ महिने पर्यत असु शकतो.

सदर आदेश हा माझी सही व शिक्यानिशी देण्यात येत आहे.

(दीपक शिवानंद पाण्डेय्)
पोलीस आयुक्त, नाशिक शहर
तथा सक्षम प्राधिकारी महाराष्ट्र पोलीस
अधिनियम,१९५१

प्रति

१) मनसे (शहराध्यक्ष व जिल्हाध्यक्ष) नाशिक

(सदर हा आदेश महाराष्ट्र नवनिर्माण सेना अध्यक्ष श्री. राज ठाकरे यांचे निर्दशनास आणुन दयावा.)

२) शहर–ए–खतिब, सुन्नी मर्कज सिरत कमिटी, नाशिक

प्रति,

१) सर्व पोलीस उप आयुक्त, व सर्व सहा. पोलीस आयुक्त, नाशिक शहर

२) सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व शाखा प्रमुख नाशिक शहर

प्रत,

१) मा. अपर मुख्य सचिव (गृह) महाराष्ट्र शासन मुंबई

२) मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मंबई

३) मा. अपर मुख्य सचिव, पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन मुंबई

४) मा.सचिव, महाराष्ट्र प्रदुषण महामंडळ, मुंबई ( मार्फत प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, नाशिक)

५) मा. धर्मदाय आयुक्त,नाशिक

६) मा. जिल्हाधिकारी, नाशिक

७) मा. महानगरपालिका आयुक्त, नाशिक

८)प्रादेशिक अधिकारी,एम.आय.डी.सी.नाशिक

सदर आदेश सर्व मंदिर, मशिद, गुरूव्दारा, चर्च व इतर धार्मिक संस्थान यांना कळविण्यात यावा, व त्याचा पुर्तता अहवाल पोलीस आयुक्त, कार्यालयात सादर करावा. तसेच मा. महानगर पालिका, आयुक्त व मा. जिल्हाधिकारी, प्रादेशिक अधिकारी एम.आय.डी.सी.नाशिक यांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांचे हद्दीत धार्मिक स्थळे कुठल्या ''ध्वनी झोन'' मध्ये मोडतात त्याची वर्गवारी करून अहवाल सादर करावा.

प्रति,

१) जिल्हा माहिती अधिकारी : सदर आदेश हा राजपत्रात प्रसिध्द करून; सर्व इलेक्टॉनिक्स व प्रिंट मिडीया माध्यमातुन प्रसिध्द करण्यात यावा.

२) पोलीस आयुक्त, नाशिक शहर पीआरओ (वाचक) सदर आदेश हा नाशिक शहर पोलीस आयुक्तालयाचे वेब साईट टयुवटर हॅन्डल, फेसबुक व पोलीस पत्रकमध्ये प्रसिध्द करण्यात यावा.

पोलीस आयुक्त नाशिक शहर

Deepak 17.4.22



Scanned with CamScanner